भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी

तारीखः- २९/०७/१८

**कोटेशन नोटीस**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपलिका महापालिकेंच्या वाहन विभागात खालील कामाची कोटेशन दि.३०/०७/२०१८ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत मागविणेत येत आहेत. कामाबाबतची संपुर्ण माहिती वाहन व्यवस्थापक, वाहन विभाग यांचे कडून घेऊनच कोटेशन भरावीत मागाहुन कोणत्याही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणार नाही. तसेच कोटेशन भरताना सर्व करांसहित व खर्चासहित भरावीत. मागाहून कोणत्याही कारणास्तव जास्त मागणीचा विचार केला जाणार नाही. कमी किंवा जास्त दराची कोटेशन नाकारणेचा अधिकार खालील सही करणार यांनी राखुन ठेवलेला आहे. उशिरा आणलेली कोटेशन कोणत्याही कारणास्तव स्विकारली जाणार नाहीत.

---

**अग्निशमन विभागाकडील मनपा वाहन क्रं एम.एच.०४ एएन ३९३५ (फायर इंजिन) ची दुरुस्ती :-**

**१) जॉईन्ट दुरुस्ती :-** जॉईन्टचे सर्व नट बोल्ट खोलून जॉईन्ट क्रॉस बाहेर काढुन जुना जॉईन्ट क्रॉस खोलून ज्याजागी नविन १६१३ चा मोठा जॉईन्ट, क्रॉस असेंम्बली, सेन्टर क्रॉस, सेन्टर बेरिंग, जॉईन्टचे ८ नग बोल्ट नविन फिट करुन जॉईन्टची रिफिटींग करणे.

**२) हब ग्रिसींगचे काम :-** सर्व प्रथम मागील दोन्ही बाजुचे टायर खोलून ड्रम बाहेर काढुन दोन्ही ड्रमला लेथ मशिनवर लाईट कट मारुन जुने लायनर पॅड काढुन त्याजागी नविन लायनर पॅड फिटींग करणे व खराब झालेली बेरींग काढुन त्याजागी नविन बेरींग व ऑईल सिल फिटींग करुन ग्रिस भरुन पुन्हा ड्रम फिट करुन हब ग्रिसींगची दुरुस्ती करणे. तसेच पुढील दोन्ही बाजुचे टायर खोलुन ड्रमला कटींग करुन नविन बेरींग व ऑईल सिल फिटींग करुन ग्रिस भरुन पुढचे ही टायर हब ग्रिसींग करणे.

**३) नविन टायर फिट करणे :-** सदर वाहनाकरिता स्टँण्डर्ड कंपनीचे १०.००x२० साईजचे ०६ नग नविन टायर, टयुब पॅड सहित नविन पुरवुन वाहनास फिट करणे.

Choudhari

वाहन व्यवस्थापक,

**भि. नि. शहर महानगरपालिका, भिवंडी.**

---

तारीखः- २९/०७/१८

खालील ठिकाणी प्रसिध्द केली.

१) मनपा संकेतस्थळ,

२) मुख्य कार्यालय नोटीस बोर्ड